विद्या प्रसारक मंडळ, ठाणे

मासिकाचे नाव	:	**सध्दर्म : त्रैमासिक**
संचालक	:	गुंडोपंत, हरिभक्त
प्रकाशक	:	सध्दर्म प्रकाशन
प्रकाशन वर्ष	:	१९७२
वर्ष	:	सातवें
अंक	:	चौथा
पृष्ठे	:	१६ पृष्ठे

गणपत्रिका विद्या प्रसारक मंडळाच्या "ग्रंथालय" प्रकल्पांतर्गत निर्मिती

गणपत्रिका निर्मिती वर्ष : २०१०

गणपत्रिका क्रमांक : २९

Registered with the Registrar of Newspapers for India, under R.N. 20770/71

वर्ष सातवें
अंक चौथा
ज्येष्ठ, १८९४
ऑक्टोबर, १९७२
वार्षिक वर्गणी
एक रुपया
किरकोळ अंक
पंचवीस पैसे

सद्धर्म

त्रैमासिक

संचालक
गुंडोपंत हरिभक्त

या चौथ्या अंकांत....

भारत धुंदीत आहे

"India lies in a stupor. Only her own sons can kill her. No one else can dare to touch her."

Mrs. Annie Besant

"भारत सध्यां गुंगींत आहे. तिचे पुत्रच तिचा घात करूं शकतील. तिच्या केसालाही स्पर्श करण्याची दुसऱ्या कुणाची छाती नाहीं."

स्वातंत्र्याचा लढा चालू असतां सुमारें ५० वर्षांपूर्वी बेझंटबाईंनीं वरील उद्गार एका अत्यंत ओजस्वी अशा भाषणाचा शेवट करतांना काढले होते.

आजही भारताला त्यांची आठवण करून देणें आवश्यक आहे. बेझंटबाईंच्याकाळीं भारत दीर्घकालीन दास्यामुळें गुंगींत होता; तर आज स्वातंत्र्यप्राप्तीनंतर सर्व बाजूंनीं बळावलेल्या स्वार्थांध दुष्प्रवृत्तींपायीं तो धुंदींत आहे. ह्या दुष्प्रवृत्तींना आपण वेळींच कायमचें न आवरूं तर आपला घात आपणच करून घेऊं, हें नीट ध्यानांत बाळगा.

सुनो भाई साधो	२
विनंती असो की.....	२
सामर्थ्य धर्मातच	३
ध्वनिसृष्टींतील अपूर्व शोध !	९
पुढल्या वर्षी लवकर या !	१३
सूचीकटाहन्याय	१४
सेवेसीं श्रुत होय...	१५
धर्म गतिमान आहे	१६

पुढील अंक नेहमींप्रमाणें जानेवारी महिन्यांत प्रसिद्ध होईल.

सद्धर्म प्रकाशन कार्यालय :
९ ओपेनहन रोड, मुंबई नं. ७
फोन ३५८४१३
भेटण्याची वेळ :
सकाळीं ९ ते ११

सुनो भाई साधो

ॐ ह्या मंत्राची महती वेदकालापासून आपले ऋषिमुनि सांगत आले आहेत. कबीराचे ह्या विषयीचें पुढील पद बोधप्रद होईल.

ॐ नाम धन खेती मेरी, ॐ नाम धन खेती ।
ॐ का बीज जो बोया तुने, उपजे हीरा मोती ॥
घरके बीज जो घरके हाली, फिर क्यों भई पछेती ।
इस खेतीनु हाला ना मलवा, पुछलो संतो सेती ॥
ज्यो कियाया सो फल पाया सारी उमर है बीती ।
कहे कबीर सुनो भाई साधो बिन तन कहर खेती ॥

ॐ हा मंत्र हीच माझी अमोल अशी शेती आहे, ॐ हेंच माझें सारें धन आहे.
ॐ चें बी पेरलें, त्यांतून माणिक-मोतीं उपजलीं आहेत.
घरचेंच बीं आणि घरचाच नांगर, मग कमी काय आहे!
ह्या शेतीला नांगर नको कीं खत नको; हवें तर संतांना विचारून पाहा.
सारें आयुष्य मीं ही शेती करण्यांत घालविलें आहे. पेरलें त्याचें फळ मला मिळालेलें आहे.
ॐ मंत्राशिवाय जन्म व्यर्थ आहे. ओसाड शेतच तें! साधो, माझें म्हणणें ऐकून ठेव.

—संत कबीर हा एक साक्षात्कारी पुरुष होता, हें सर्वश्रुत आहे.

विनंति असो कीं

१. वर्गणी धाडतांना आपण कुणे कीं नवे वर्गणीदार, तें अवश्य कळवावें. आमचें कितीतरी कारकुनी काम कमी होईल! आणि कुन्यांनीं आपला वर्गणीदार क्रमांक कळविल्यास, अधिकस्य अधिकं फलं! लगेच ओळख पटेल.

२. 'सद्धर्माची वार्षिक वर्गणी काय एकच रुपया आहे! त्यामुळें ती आम्ही केव्हां दिली, तें आमच्या लक्षांत नाहीं, तरी आतां आमच्याकडून किती येणें बाकी आहे, तें कळवा', असें अनेक सज्जन पत्र लिहून विचारतात. धन्यवाद. पण त्यांनीं कृपा करून उत्तरासाठीं बोट कार्ड धाडावें. आमच्या वरचा खर्चाचा बोजा तेवढाच कमी होईल, नाहीं का?

३. वर्गणी पोस्टल ऑर्डर वा चेकनें पाठवूं नये. पोस्टांत व बँकेंत धाडायला आमच्या जवळ मोणूस कुठून असणार? आणि व्ही. पी. चीही अपेक्षा करूं नये. क्यूंत उभे राहायला आम्हांसी वेळ कैचें?

॥ ॐ शुभं भवतु ॥

महाभारत, कर्णपर्वात[1] एक अत्यन्त बोधप्रद प्रसंग आहे. "तुझ्यानें कर्णाचा वध होत नसेल तर आपलें गांडिव दुसऱ्याच्या हातीं दे, उपयोग काय त्याचा?" असें अर्जुनाला चेव आणण्यासाठीं युधिष्ठिर त्याला म्हणतो. असे शब्द कोणी आपणासमोर उच्चारले असतां, आपण त्याचा तावडतोब वध करूं अशी लहानपणीं अर्जुनानें प्रतिज्ञा केलेली असते. तेव्हां युधिष्ठिराचे हे शब्द कानीं पडतांच अर्जुन चवताळून त्याची हत्या करण्यास प्रवृत्त होतो. तेव्हां श्रीकृष्ण मधें पडतात आणि अर्जुनाला शांत करीत, धर्म म्हणजे काय व अधर्म काय याचे विस्तारपूर्वक विवेचन करतात. तें करीत असतांना श्रीकृष्ण त्याला दोन कथा सांगतात. त्या रहस्यपूर्ण आहेत.

बलाक नांवाचा एक व्याध मृगया करून आपल्या मुलाबाळांचा चरितार्थ त्यावर प्रामाणिकपणें चालवी. एकदां त्याला रानांत कुठेंच कांहीं शिकार आढळली नाही. तेव्हां हताश होऊन तो एका विस्तीर्ण तलावाकांठी पाणी पिण्यासाठीं आला असतां त्यांत एक अंध श्वापद विहार करीत असलेलें त्याला दिसलें. लगेच व्याधानें त्यावर बाण सोडून त्याची हत्या केली. त्याबरोबर आकाशांतून त्याच्यावर पुष्पवृष्टि झाली आणि देवांनीं विमान पाठवून त्याला स्वर्गांत नेलें. कारण तें अंध श्वापद म्हणजे एक भयंकर राक्षस असून, शिवाची खडतर तपश्चर्या करून, हवें तेव्हां अवघी पृथ्वी दग्ध करून टाकण्याचें सामर्थ्य त्यानें त्याच्या वरानें मिळविलेलें होतें. तेव्हां अशा त्या भयंकर श्वापदाची हत्या करून व्याधानें पृथ्वीवरचें एक महान संकट टाळलें, म्हणून त्याला ही सद्गति मिळाली.

दुसरी कथा कौशिक नांवाच्या एका तपस्व्याची आहे. कधीही असत्य भाषण करावयाचें नाहीं, असा त्याचा कृतनिश्चय होता. एकदां कौशिक नदीसंगमावर एका झाडाखालीं चिंतन करीत बसला असतां समोरून हातांत परजत असलेल्या तलवारी घेतलेले कांहीं क्रुद्ध मुद्रेचे चोर त्याच्याकडे आले आणि "आतां थोड्या वेळापूर्वी इकडेनसे भयभीत झालेले लोक ह्या वाटेनें आले, ते कुठें गेले तें सांग; मुने, खोटें बोलूं नकोस," असें त्यांनीं त्याला दरडावून म्हटलें. कौशिकानें शांतपणे उत्तर दिलें, "बाबांनो, मी कधींच असत्य भाषण करीत नाहीं. तुम्ही म्हणता ते लोक ह्या उजव्या बाजूला जी गर्द झाडी दिसत आहे, त्यांत गेले." हें ऐकतांच ते क्रुद्ध चोर लगेच त्या झाडींत शिरले आणि तेथें त्या लोकांना गाठून त्यांनीं त्यांची अत्यंत निर्दयपणें कत्तल करून त्यांचें सारें धन लुबाडलें. कौशिक सत्य बोलला हें खरें; पण त्यापायीं निष्पाप निरपराधी लोकांची कत्तल झाली आणि चोरांचें फावलें म्हणून कौशिकाला त्याचें प्रायश्चित्त म्हणून दुर्गति लाभली!

ह्या दोन कथांतील रहस्य सांगून भगवान अर्जुनाला म्हणतात, "पार्था, धर्म कोणता आणि अधर्म कोणता[2] हें ठरविणें सामान्य जनांना कठिण आहे. ज्ञानी आणि अनुभवी

१. महाभारत, कर्णपर्व, अ. ६९, श्लोक ४० व पुढें.

२. "...धर्मस्य तत्त्वं निहितं गुहायां
महाजनो येन गतः स पन्थाः ॥
म. भा. वन, ३१२,११७.

माणसेंच त्याचा निर्णय करूं शकतात. बाबारे, हिंसा ही वाईटच, आणि त्यांतून अंध प्राण्याची हिंसा करणें ह्यासारखें तर पातक नाहीं. पण तें करूनही बलाकाला सद्गति लाभली. त्याच्या उलट कौशिकाला सत्य भाषण केल्यानें दुर्गति लाभली! पार्था, ह्या कथांचा नीट विचार कर. अरे, धर्म म्हणजे काय, तें ऐक :

"धारणाद्धर्ममित्याहुर्धर्मो धारयते प्रजाः।
यत् स्यात् धारणसंयुक्तं स धर्म इति निश्चयः॥

—कर्णपर्व, ६९-७०.

"धारण करणारा तो धर्म असें म्हणतात. धर्मानें प्रजेला म्हणजे समाजाला स्थैर्य येतें. ज्या आचरणामुळें समाजाचें धारण होतें म्हणजे जें आचरण समाजाच्या स्थैर्याला कारणीभूत होतें, तें आचरण म्हणजे धर्म, हें निश्चित समज"

धर्माची ही व्याख्या अगदीं स्पष्ट आहे. त्यावरून आपला धर्म म्हणजे एखाद्या दैवी पुरुषाचा संदेश वा ग्रंथ,[3] एखादा गूढवाद वा अतिमानवी चमत्कार वा परलोकाच्या उठाठेवीही नसून, ज्यामुळें समाजाला स्थैर्य प्राप्त होईल अशा प्रकारचें वर्तन वा आचरण म्हणजेच धर्म होय, हें करतलामलकवत् अगदीं स्पष्ट आहे.

धर्माची ही व्याख्या आपल्या प्राचीन वाङ्मयांत अन्यत्रही आलेली आहे. उदाहरणार्थ,

"धर्मो विश्वस्य जगतः प्रतिष्ठा।
धर्मे सर्वं प्रतिष्ठितम्॥"

—अनुवाक ७९

असें नारायणोपनिषदांत म्हटलें आहे. त्याचा मथितार्थ धर्मामुळेंच समाजाला स्थैर्य व प्रतिष्ठा प्राप्त होते असा आहे.

श्रीमत् शंकराचार्यांनींही शांकरभाष्याच्या उपोद्घातांत पुढीलप्रमाणें म्हटलें आहे :

"जगतः स्थितिकारणं साक्षात् प्राणिनाम-भ्युदयनिश्रेयसहेतुर्[4]: स धर्मः।"

म्हणजे समाजाला स्थिरता आणणारा व लोकांचा अभ्युदय करून त्यांचें आत्यंतिक कल्याण साधणारा तो धर्म, अशीच त्यांनीही धर्माची व्याख्या केलेली आहे.

त्यावरून समाजाचें गाडें नीट चालून त्याला स्थैर्य प्राप्त करून देणारी धर्म ही एक समाजव्यवस्था आहे, असें निश्चितपणें म्हणतां येतें.

आतां आपल्या ह्या धर्माचें मूळ काय म्हणजे त्याचा मूलाधार कोणता असा साहजिकच प्रश्न उद्भवतो. त्याचें उत्तर "वेदोऽखिलो धर्ममूलं।" (मनु. २·६) असें स्मृतिकारांनीं

३. धर्म म्हणजे Religion रिलिजन नव्हे, हेंही अर्थातच उघड आहे. रिलिजन च्या मागें एखादा विशिष्ट प्रेषित वा ग्रंथ असतो व त्यावर संपूर्ण विश्वास व तोच आपला उद्धार करील, इतरांकडून तो होणें नाही अशी संपूर्ण श्रद्धा अवश्य असते, हें ध्यानांत बाळगावें. 'धर्माची' गोष्ट तशी नाहीं. "धर्म म्हणजे 'रिलीजन' नव्हे", सद्धर्म, प्रथम वर्ष, अंक २ (जानेवारी १९६६) हा अग्रलेख अवश्य पाहावा.

४. निश्रेयस्- नितराम् श्रेयस् - आत्यंतिक कल्याण.

५. वेद-विद्-जाणणें; वेद म्हणजे ज्ञान.
श्रुतिस्तु वेदोविज्ञेयो।' —मनु. २-१०
श्रुतिप्रमाणको धर्मः। —हारित.
"प्रामाण्यबुद्धिर्वेदेषु।" —टिळक

दिलेलें आहे. वेद अतएव श्रुति अनेक आहेत. तेव्हां अखिल वेद ह्याचा अर्थ हा सर्व श्रुतिसमुच्चयांत सांठवून ठेवलेलें अनुभवसिद्ध ज्ञान असा आहे. त्यावरून पूर्वापार पिढ्यानुपिढ्या प्राप्त झालेलें समाजस्थैर्याला पोषक असें जें ज्ञान त्यावर आपला धर्म आधारलेला आहे, हें उघड आहे.

समाज हा नेहमी बदलत असतो. तेव्हां त्याला स्थैर्य लाभावें म्हणून निर्माण झालेल्या धर्मांतही देशकालवर्तमानाप्रमाणें बदल करणें अवश्य असतें. तसा बदल आपल्या धर्मांत परिस्थितियुनुरूप वेळोवेळीं झालेला आहे; आणि तो अत्यंत प्राचीन काळापासून चालत आलेला असल्याकारणानें आतां आपल्या धर्माचें एक मोठें शास्त्रच बनलेलें आहे.

धर्मशास्त्रावरील ग्रंथांना स्मृति असें नांव आहे.[६] मनुराजा हा आपला आद्य स्मृतिकार होय. त्याचा उल्लेख महाभारतादि ग्रंथांत अनेकदां आलेला आहे. त्यानंतर याज्ञवल्क्य, गौतम, वसिष्ठ,[७] बोधायन वगैरे अनेक स्मृतिकार होऊन गेलेले आहेत. वीरमित्रोदय ग्रंथांत एकंदर ५७ स्मृतिकार सांगितले आहेत.

सध्यां मनुस्मृति[८] म्हणून अत्यंत प्रसिद्ध असा जो ग्रंथ आहे तो भृगुनामक एका अर्वाचिन स्मृतिकारानें प्राचीन मनु व इतर स्मृतिकार ह्यांचा आधार घेऊन लिहिलेला ग्रन्थ आहे.

स्मृतींचे म्हणजे धर्मशास्त्रावरील ह्या ग्रंथांचे साधारणपणें तीन भाग असतात. १) आचार २) व्यवहार ३) प्रायश्चित्त असे ते होत.

आचार ह्या भागांत सर्वसामान्य माणसानें समाजांत कसें वागावें याचे दण्डक घालून दिलेले आहेत. समाजाचें स्वास्थ्य व्यक्तीच्या आचरणावरच सर्वस्वीं अवलंबून असल्यानें स्मृतिग्रन्थांचा हा प्राण म्हणतां येईल. त्यांत स्नान, संध्या, जप, पंचयज्ञ वगैरे नित्याचीं आणि श्राद्धादि नैमित्तिक कर्में, तसेंच उपजीविकेचीं भिन्न भिन्न साधनें, समाजांतील सर्व थरांच्या व्यक्तींचे परस्परांशीं संबंध व वागणूक, विवाहादि संस्कार, स्त्रीपुरुषांचे शरीरसंबंध (जास्पत्य), आहार, पोशाख, आरोग्य, शिष्टाचार इत्यादि समाजांतील दैनंदिन अशा अनेक गोष्टींचा समावेश असून, त्याबाबतींतील वागणुकीचे नियम वा दण्डक घालून दिलेले आहेत. त्यांनांच आपल्या धर्मांत आचार असें नांव आहे.

'व्यवहार' ह्या भागांत राजा व त्याचीं कर्तव्यें, राज्यव्यवस्था, व्यापार आणि कर, परराज्यांशीं संबंध, संरक्षण, तद्वत् प्रजेच्या आपसांतील देवघेवी, कर्ज व गहाणखतें, वारसा, स्त्रीधन, दत्तकविधान, साक्ष व साक्षीदार, चोरी व इतर गुन्हे आणि त्यांची

६. 'धर्मशास्त्रं तु वै स्मृतिः।"
—मनु, २१०

७. सर्व स्मृतिकारांनीं आपल्या ग्रंथांना 'धर्मशास्त्र' असें नांव दिलें आहे. उदाहरणार्थ, 'इतिवासिष्ठे धर्मशास्त्रे... अध्यायः।' असें प्रत्येक अध्यायाचे शेवटीं वसिष्ठस्मृतींत म्हटलेलें आहे.

८. मनुस्मृतीच्या प्रत्येक अध्यायाच्या शेवटीं "इति मानवे धर्मशास्त्रे भृगुप्रोक्तायां संहितायां...अध्यायः॥" असें लिहिलेलें आहे. सद्धम, वर्ष ५, अंक ४ (ऑक्टोबर, १९७०) 'अनर्थांचें मूळ' हा अग्रलेख अवश्य पाहावा.

चौकशी, इत्यादि ज्यांना हल्लीं आपण कायदा असें म्हणतों त्या नाना प्रकारच्या गोष्टींचें विवेचन असून, त्या कशा हाताळाव्या, तें विस्तारानें सांगितलें आहे.

आणि तिसऱ्या म्हणजे प्रायश्चित्त ह्या विभागांत कोणत्याही व्यक्तीनें आपलें विहित कर्म न केल्यास अथवा एखादें समाजद्रोही वर्तन तिच्या हातून जाणून वा अजाणपणें घडल्यास, तिला कोणतें शासन असावें व तें कोणी करावें ह्याचे आदेश आहेत.

धर्मशास्त्रावरील ग्रंथांच्या वरील तपशीलाकडे पाहिलें असतां आपला धर्म म्हणजे समाजाच्या स्थैर्यासाठीं निर्माण झालेली, देशकालवर्तमानाप्रमाणें बदलणारी ती एक व्यापक स्वरूपाची समाजव्यवस्था आहे, असें कुणासही मान्य करावें लागेल. सर्व थरांतील लोकांच्या प्रत्यक्ष जीवनाशीं संबंध असलेली कोणतीही लहान अथवा मोठी बाब स्मृतिकारांच्या कक्षेंतून सुटलेली नाहीं. त्या सर्व बाबतींतील नियमांची तपशीलवार जंत्री त्यांनीं आपल्या ग्रंथांतून दिलेली आहे. त्यांत व्यक्तीच्या आचरणाला[९] म्हणजे वागणुकीलाच प्राधान्य दिलेलें असल्यामुळें, हिंदुधर्म हा आचारप्रधान धर्म आहे, असें म्हटलें जातें.

"आचारः परमो धर्मः"—मनु. १-१०८

हें मनुवचन प्रसिद्ध आहे.

व्यक्तीचें आचरण कशा प्रकारचें असावें हें ठरवितांना स्नानसंध्या, जप, पंचयज्ञ वगैरे नित्यकर्मांत स्मृतिकारांनीं वैदिक मंत्र पदोपदीं समाविष्ट केलें असून, अध्ययन-अध्यापन व दान-अपरिग्रह अशांसारख्या मानवाला उन्नत करणाऱ्या गोष्टींवर त्यांनीं आपल्या ग्रंथांतून विशेष भर दिला आहे व चित्तशुद्धि आणि शीलसंवर्धनाची महत्ता जागोजागीं आवर्जून वर्णिली आहे. त्यावरून आपल्या धर्माची उभारणी करतांना स्मृतिकारांनीं मानव जातीला निःश्रेयस प्राप्त करून देणें हें जें वेदांचें अंतिम ध्येय, त्यावरून आपली दृष्टि मुळींही चळूं दिलेली नाहीं, असें दिसून येतें.

त्या बरोबरच आपली ही समाजव्यवस्था निर्माण करतांना, जेथें जेथें वैयक्तिक हित[१०] समाजस्थैर्याच्या आड येण्याचा संभव आहे असें स्मृतिकारांना वाटलें, तेथें तेथें समाजाच्या व्यापक कल्याणावर दृष्टी ठेवून त्यांनीं व्यक्तीच्या संकुचित हिताला गौणस्थान दिलें आहे. त्यावरून स्मृतिकारांनीं निर्माण केलेला आपला हा हिंदुधर्म सर्वथा समाजनिष्ठ आहे, किंबहुना आजच्या दैनिक भाषेंत सांगायचें म्हणजे तो खरोखरी 'समाजवादावर' अधिष्ठित आहे, असें स्पष्ट दिसून येतें.

अशा रीतीने आपण चालून दिलेल्या धर्मामुळें निर्माण झालेला स्थिर समाज कुणाही विशिष्ट व्यक्ति वा गटाच्या स्वार्थी आकांक्षांना बळी पडून समाजांत आसुरी लालसांचा प्रादुर्भाव होऊं नये म्हणून समाजाचें खरें नेतृत्व करण्यास अधिकारी पुरुष कोण[११] हेंही धर्मशास्त्रकारांनी निस्संदिग्ध-

९. सद्धर्म, वर्ष ५ अंक १ (जानेवारी, १९७०) 'अथा तो धर्मजिज्ञासा' हा अग्रलेख अवश्य पाहावा.

१०. "The Hindu Code insists on the motive of social service, not personal gain."—Dr. Radhakrishnan, Religion and Society, p. 106.

११. वसिष्ठ धर्मशास्त्रांत धर्माची व्याख्या

[पुढील पान पहा]

पर्णे सांगून ठेविले आहे.

मनुस्मृतीचा उपसंहार करताना, भृगु-ऋषि म्हणतात :

"सर्वभूतेषु चात्मानं सर्वभूतानि चात्मनि ।
समं पश्यन्नात्मयाजी स्वाराज्यमधिगच्छति ॥"

—मनु, १२-९१.

म्हणजे एकच आत्मा सर्वांभूतीं आहे अशा जाणिवेमुळें ज्याचा अहंकार नाहींसा झाला आहे व म्हणून जो सर्व प्राणिमात्रांशीं साम्यबुद्धीचें आचरण करतो, असा आत्मयाजी (Selfless) पुरुषच स्वाराज्य म्हणजे निःश्रेयस मिळवूं शकतो आणि तोच समाजाचें नेतृत्व करण्यास लायक आहे. त्या पुरुषालाच धर्माचे दंडक घालून देण्याचा अधिकार आहे.

असे अधिकारी पुरुष भारतांत आजवर अनेक होऊन गेलेले आहेत. त्यांच्या मार्गदर्शनामुळेंच हिंदुधर्म अजून टिकून राहिला आहे. असो.

समाज हा विकसनशील असल्याकारणानें त्याचें स्थैर्य अबाधित असावें म्हणून निर्माण केलेल्या व्यवस्थेत म्हणजे धर्मांत देशकाल-

मागील पानावरून]

सांगून पुढीलप्रमाणें विधान केलें आहे :

"श्रुतिस्मृतिविहितो धर्मः ॥
तदलाभे शिष्टाचारः प्रमाणम् ॥
शिष्टः पुनरकामात्मा ॥"

—(अ. १,४-५-६)

म्हणजे "श्रुतिस्मृतींनीं धर्म सांगितलेला आहे; पण त्या धर्मानें कार्यभाग न झाल्यास, ज्यांनीं कामक्रोध जिंकले आहेत, अशा संयमी पुरुषांनीं घालून दिलेले आचार प्रमाण मानावे."

वर्तमानेंकरून अवश्य ते फरक वेदवेत्त्यांनीं म्हणजे ज्ञानी व अनुभवी पुरुषांनीं करणें अटळ असल्याचा उल्लेख वर आलेलाच आहे. असे फरक आपल्या ह्या प्राचीनतम हिंदुधर्मांत अनेकदां करण्यांत आलेले असल्याचें निरनिराळ्या स्मृतिग्रंथांवरून सहज ध्यानांत येईल. उदाहरणार्थ, यज्ञयाग, अग्निपूजा आणि इंद्रादि देवतांचें नानाविध इष्टींत आवाहन व स्वार्थनिमित्त सोमपान, हीं एकेकाळीं धर्माला विहित होतीं. पण त्यांत पुढें यथाकाळ बदल करून इष्टदेवतेच्या षोडशोपचार अथवा निव्वळ साध्या पूजनानें वा नुसत्या जपानेंही नित्यकर्म केलें, तरी प्रत्यवाय[१२] नाहीं, असें स्मृतिकारांनीं देशकालवर्तमानाकडे नजर देऊन निर्णयपूर्वक सांगितलें आहे.

आहारांत झालेला बदल सर्वांना परिचित आहेच. एकेकाळीं मांसभक्षण शास्त्रांत विहित होतें; एवढेंच नव्हें तर श्राद्धादिकांत तें केलेंच पाहिजे असा आग्रह होता. पण पुढें स्मृतिकारांनींच तें त्याज्य ठरविलें नाहीं का ?[१३]

आणि नियोगाची विलक्षण पद्धत घ्या. एके काळीं ती धर्मशास्त्राकारांना संमत होती. पण आज ? आज कुणाला नियोग[१४] म्हणजे काय हें सहसा ठाऊक नाहीं तेंच बरें ! तें सांगितले तर अंगावर शहारे येतील !!

समाजाचें धारण व्हावें म्हणून आपल्या धर्मशास्त्रकारांनीं धर्मांत वेळोवेळीं बदल केल्याची वरील प्रमाणें आणखीही अनेक उदाहरणें देतां येतील.

१२. मनु, ३-६७; विष्णु, ४९-१४; ५५-१९
१३. मनु, ५-२७; ३२-४९; विष्णु, ६५-१
१४. मनु, ९-५९; ६०-६४; ५-१५८

अत्यंत प्राचीन काळीं मनुराजानें धर्मशास्त्राचा पाया घालून दिला तेव्हांपासून अनेक ऋषिमहर्षींनीं पूर्वपरंपरा आणि प्रचलित वस्तुस्थिती ह्यांचा तटस्थपणें विचार करून समाजाला स्थैर्य लाभून तो प्रगति पथावर असावा एतदर्थ त्यांत आपआपल्या स्मृतींची भर टाकली.[१५] तें कार्य ब्रिटिशांचे पाय भारतांत रोवले तो पर्यंत अव्याहत चालू होतें. म. म. काणे ह्यांच्या धर्मशास्त्रावरील ग्रंथांत एकंदर २७ धर्मसूत्रकार २३ स्मृतिकार व त्यांवरील ५६ निबंधांची संगतवार माहिती दिलेली असून एकूण सुमारें ३५८८ धर्मशास्त्रावरील ग्रंथकारांचीं नांवें आणि त्यांच्या जवळ जवळ ५७८० ग्रंथांचे उल्लेख आलेले आहेत ! ह्याशिवाय कितीतरी ग्रंथ काळाच्या उदरांत गडप झाले असतील ते वेगळेच !

वरील माहितीवरून आपलें धर्मशास्त्रविषयक वाङ्मय किती अथांग आहे, ह्याची कल्पना येईल. दुर्दैवानें त्या जलाशयांत अव्याहतपणें भर टाकीत असलेले ग्रंथरूपी जिवंत झरे ब्रिटिशांच्या आमदानींत इंग्रजी शिक्षणाची चलती झाल्यावर एकाएकी आटले आणि धर्मशास्त्रावरील ग्रंथांत भर पडण्याचें कार्य स्थगित होऊन आपला धर्म म्हणजे तें एक सांठलेल्या पाण्याचें डबकें बनलें !! कायदेशास्त्राचे तज्ज्ञ म्हणून गेल्या शतकाच्या उत्तरार्धांत प्रसिद्धी पावलेले पंडितवर्य सर हेनरी मेन साहेबांच्या पुढील कबुलीजबाबावरून ही गोष्ट सिद्धच होते.

आपल्या "Village Communities," 1890, p. 47 ह्या पुस्तकांत साहेबमजकुर स्पष्टपणें म्हणतात,

"There is in truth but little doubt . . . that the influence of the English rather retarded than hastened the mental development of the (Indian) race."

आमच्या हिंदुसमाजाच्या सध्यांच्या ऱ्हासाच्या अपयशाचें खापर आपल्या धर्माच्या मस्तकावर फोडण्यास सबकलेल्या आजच्या महाभागांनीं आपला धर्म म्हणजे खरोखरी काय आहे तें नीटपणें समजून घेण्याची तसदी घ्यावी आणि मेन साहेबांच्या वरील कबुलीजबाबाचाही शांतपणें व पूर्वग्रह टाकून देऊन विचार करावा, म्हणजे मग त्यांना अपेक्षित असलेला खरा समाजवाद भूतलावर प्रस्थापित करण्याचें सामर्थ्य धर्मातच आहे, हें ध्यानांत येऊन त्यांत देशकालवर्तमानेकरून अवश्य ते बदल करण्याची सुबुद्धि परमेश्वर त्यांना देईल.

मात्र तसें करण्याची पात्रता आणि अधिकार

"सर्वभूतेषु चात्मानं सर्वभूतानि चात्मनि ।
समं पश्यन्नात्मयाजी ॥

—मनु १२-९१

अशा आत्मयाजी (selfless) महाभागांचाच आहे, हें नीटपणें ध्यानांत असूं द्यावें.

॥ ॐ आद्यस्मृतिकाराय मनुराजाय नमः ॥

१५. मनुस्मृतीचा प्रख्यात टीकाकार मेधातिथि ह्यानें स्पष्ट म्हटलें आहे कीं, आजच्या काळांत जर तसाच एखादा अधिकारी पुरुष निर्माण होऊन आपली 'स्मृति' तयार करील, तर भावी पिढ्या मनु आणि इतर स्मृतींच्या इतकीच ती शिरोधार्य मानतील.—

मेधातिथि, मनु, २-६.

Quoted by Dr. Radhakrishnan, l.c. p. 117.

"तरी सर्व मंत्रांचा राजा।
तो प्रणवो आदिवर्णू बुझा॥
—ज्ञानेश्वरी, १७-३४२

ॐ हा ध्वनि म्हणजे भारताचें एक खास वैशिष्ट्य आहे. अशा प्रकारचा ध्वनि अथवा ॐ हें चिन्ह पृथ्वीवरील इतर कोणत्याही भागेंत आढळून येत नाहीं.

ॐ हा ध्वनि तीन ध्वनींच्या संयोगाने निर्माण झालेला आहे. ते तीन ध्वनि अ, ऊ आणि म् हे होत. ह्यांतील पहिला अ' हा मुखांतून निघणारा आद्य ध्वनि असून, तो श्वासनलिकेंतून अगदी सहजपणें उच्चारला जातो. त्यास जिभेचा अथवा वरच्या टाळ्याचा आधार घ्यावा लागत नाहीं. 'म्' हा अनुनासिक ध्वनि सर्व ध्वनींतील शेवटचा असून तो उच्चारण्यासाठी दोन्ही ओंठ मिटावे लागतात आणि 'ऊ' हा मधला ध्वनि गाल आंत दाबले असतां, श्वासनलिका आणि ओंठ ह्यांच्यामध्यें उत्पन्न होतो. म्हणजे अ, ऊ आणि म् ह्या तीन ध्वनींच्या मिश्रणानें तयार होणारा ॐ हा ध्वनि, श्वासनलिका, तोंडाचा गालांतील भाग आणि मिटलेले ओंठ ह्यांत अगदी अनायासें आणि नैसर्गिक रीत्या उत्पन्न होतो.[२]

१. 'अक्षराणां अकारोस्मि' गीता, १०-३३

२. हा प्रयोग प्रत्यक्ष करून पाहण्यासारखा आहे. ॐमधील म् हा अनुनासिक ध्वनि आहे, हें ध्यानांत ठेवलें पाहिजे. तो उच्चारतांना ओंठ मिटून तोंड बंद साहजिकच होतें. पण राम, काम, दाम ह्यांतील म (म्+अ=म) हें पूर्ण अक्षर असल्यानें, त्यांचा उच्चार करतांना ओंठ उघडावे लागतात.

तो उच्चारतांना वागिंद्रियांवर आघात होत नसल्यानें त्याला अनाहत ध्वनि असें म्हणतात. अन्+आ+हन् चें अनाहत हें रूप होतें. जो उच्चारतांना आघात अथवा अडथळा होत नाही, तो अनाहत ध्वनि[३] होय.

ध्वनिसृष्टींतील आद्य ध्वनि अ, मध्यम ध्वनि ऊ आणि अंतिम असा अनुनासिक म्, हे तीन ध्वनि ॐ मध्यें समाविष्ट असल्याकारणानें त्याचा उच्चार होत असतां अवघी ध्वनिसृष्टि व्यापिली जाते. एखाद्या विस्तीर्ण अशा जलाशयाच्या पृष्ठभागावर जललहरी जशा एकांतून दुसरी, दुसरींतून तिसरी अशा क्रमानें अगदी सहज निर्माण होऊन अखेर त्या त्या जलाशयांतच विलीन होतात तद्वत

गं, गणपतये नमः, ह्या मंत्रांतील 'गं' मधील शेवटचा म्, ॐ मधील म् प्रमाणेच, अनुनासिक असल्यानें गं चा उच्चार करतांनाही, ओंठ मिटून तोंड बंद होतें. मात्र गं हा ध्वनी ॐ प्रमाणें अनाहत नाही; कारण गं चा उच्चार करताना टाळ्यावर आघात होतो. ॐ चा उच्चार करताना कुठेंही आघात होत नाही, हेंच त्याचें वैशिष्ट्य आहे. आणि आघात होत नसल्यामुळेंच त्याचा जप अखंडपणें सहजरीत्या करता येतो.

३. एकनाथी भागवतांत शिवाच्या डमरूला 'तुझा अनाहताचा डमरू' असें नाथांनीं म्हटलें आहे (ए. भा. १९-२). याच डमरूच्या निनादांतून पाणिनी महर्षीच्या व्याकरणाचीं सूत्रें निर्माण झालीं, हें सर्व श्रुत आहे (सद्धर्म, वर्ष ५, अंक २, पृष्ठ १३ पाहा)

ॐ ह्या अनाहत मंत्राचा जप मुखावाटे चालू असतां त्यावेळी एकामागून एक अगदीं सहजरीत्या उत्पन्न होणाऱ्या नादलहरी श्वासनलिका आणि मिटलेले ओंठ ह्यांचे मधील तोंडाच्या पोकळींतच ध्वनीसृष्टींत विलीन होऊन स्वानंदाची प्राप्ती करून देतात.

अशाप्रकारें नादब्रह्माचा साक्षात्कार करून देऊन जिवाशिवाचीं गांठ घालून देणारा, अ, ऊ आणि अनुनासिक म् हे तीन ध्वनि अत्यंत शिताफीनें संयोजित करून बनविलेला ॐ हा ध्वनि म्हणजे ध्वनिसृष्टींतील तो एक अपूर्व आणि अद्वितीय शोध आहे, असेंच म्हटलें पाहिजे. आणि असा हा अद्वितीय शोध लावण्याचें सामर्थ्य, कळिकाळालाही न जुमानतां, 'अहं ब्रह्मास्मि' असें छातीठोकपणें जगाला बजावून सांगणाऱ्या भारतीय तत्ववेत्त्यांखेरीज इतर कुणांत असणार? वेदांइतकाच ॐ हा ध्वनि प्राचीन असल्यानें आणि त्याचें जनकत्व कुणाकडे आहे ह्याचा कुठेंच कोही थांगपत्ता नसल्यानें, तो प्रत्यक्ष परमेश्वराचाच निश्वास आहे, असें मानल्यास त्यांत वावगें तें काय आहे?

आणि ह्या ध्वनीचें ॐ हें चिन्हही तितकेंच अद्वितीय आहे. ध्वनिसृष्टीचा आदि असा जो अ, त्याचें चिन्ह '३' असें लिहून, त्याला हत्तीच्या सोंडेसारखें 'ॐ' हें उकाराचें चिन्ह जोडून, म् हा अनुनासिक ध्वनि दर्शविण्यासाठीं त्याचे शिरोभागावर चंद्रकोर दिली आणि म् ह्या अनुनासिकाचा उच्चार करतांना ओठ बंद होऊन ध्वनी सृष्टीचा अंत गाठला जातो हें दर्शविण्यासाठीं शेवटीं त्या अक्षरावर बिंदु दिला म्हणजे ॐ असें पूर्ण चिन्ह तयार होतें. मुखावाटें ॐ चा ध्वनि निघत असतां, ध्वनिसृष्टीचा आदि, मध्य आणि अंत (अ, उ आणि म्) ह्या तिहींना व्यापून अखेर तो त्या ध्वनिसृष्टींतच विराम पावतो असें ॐ हें चिन्ह सूचित करतें. त्याचा शोध लावणाऱ्या आपल्या ऋषिमुनींच्या कल्पकतेचीही कमालच नव्हे का? आणि ॐ ह्या ध्वनीमुळें नादब्रह्माचा साक्षात्कार होत असल्यानें त्या चिन्हाला म्हणजे ॐ काराला प्रत्यक्ष परब्रह्माचेंच स्वरुप मानण्यांतही त्यांची पराकोटीची योजकता दृष्टोत्पत्तीस येते.

ॐ कार हें सृष्टीच्या आदि, मध्य आणि अंत अथवा उत्पत्ति, स्थिती आणि लय ह्या तिन्ही अवस्था दर्शविणाऱ्या ब्रह्मा, विष्णु आणि महेश ह्या त्रिमुर्तींचें चिन्ह असें मानण्यांत येतें.

तेव्हां अशा स्थितींत ॐ ह्या मंत्राला सर्व मंत्रांचें अग्रेसरत्व प्राप्त व्हावें ह्यांत आश्चर्य नाहीं. आणि म्हणूनच त्याला प्रणव असें नांव आहे. प्र+नु (२ प.)—प्रणूयते अनेन इति प्रणवः॥ मागें प्र असल्यामुळें नु चें णु झालें आहे. नु म्हणजे स्तुति, प्रार्थना अथवा ध्यान करणें. ज्याच्या सहाय्यानें उत्तम प्रकारें परमेश्वराचें ध्यान करतां येतें तो प्रणव होय.

"तरी सर्व मंत्रांचा राजा।
तो प्रणवो आदिवर्णू बुझा॥"

—ज्ञानेश्वरी २७-३४२

असें जें ज्ञानियांच्या राजानें म्हटलें आहे, तें अत्यंत सार्थ आहे.

प्रणवाची प्रशंसा फार प्राचीन कालापासून आपले ऋषिमुनि करीत आले आहेत. "अथर्वांची समग्र क्रिया करावयाची असल्यास त्यास ॐ ह्या अक्षराचा विनियोग करावा, अथर्वांचें सारें फल प्राप्त होईल," असें अथर्ववेदाच्या गोपथ ब्राह्मणाच्या प्रारंभी (अध्याय १, खंड ५) म्हटलें आहे, त्यावरून त्या ब्राह्मणकाराला ॐ काराचें महत्त्व किती वाटत होतें, तें दिसून येते.

उपनिषदकारांनी ॐची महती जागोजागीं वर्णिली आहे. "एवमोङ्कार आत्मैव" (मां. १२) ॐ म्हणजेच आत्मा असें मांडुक्यांनी म्हटलें आहे. कठोपनिषदकारांनीही "एतद्ध्येवाक्षरं ब्रह्म" (क.१.२.१५—१७), ॐ हेंच ब्रह्म होय, असें सांगितलें आहे.

छांदोग्यांत तींच गोष्ट अधिक काव्यमय रीत्या आली आहे. "झाडाचीं पानें बशी फांदीवर एकांतएक बिणल्यासारखीं दिसतात, तद्वत् सारे ध्वनि ह्या ॐकारावर विराजित आहेत" (छां. २.२३.) असें त्यांत म्हटलें आहे.

प्रणवाची महती सांगतांना मुंडकोपनिषदकारांनी तर एक बहारीची उपमा दिली आहे. ते म्हणतात, " ॐ चें धनुष्य करून त्यावर आत्मरूपी बाण चढवा आणि परब्रह्मरूपी लक्ष्यावर तो एकाग्रचित्तानें सोडा. बाण जसा लक्ष्याशीं एकजीव होतो, तद्वत् तुमचा आत्मा परमात्म्याशीं एकरूप होईल." (मु. २.२.३.४)

हीच जिवाशिवाची गांठ होय.

परब्रह्माचा साक्षात्कार होण्यासाठीं, प्रणवाचा जप करा, असें सान्या उपनिषदकारांनी एक मुखानें आवर्जून सांगितलें आहे. " ॐ इति ह्येष स्वरन्नेति," म्हणजे प्रत्यक्ष भगवान सूर्यनारायण देखील ॐ असा गंभीर निनाद करीत विश्रांत परिभ्रमण करीत असतो." असें छांदोग्यकारांनी म्हटलें आहे (छां. १-५-१-३). ॐ चें महत्त्व याहून अधिक तें कोण काय सांगणार ! प्रणव हें त्याचें नांव अगदीं सार्थ आहे. त्यामुळें परमेश्वराची प्रकर्षेण स्तुति करतां येते.

भगवान श्रीकृष्णांनीं "प्रणवः सर्व वेदेषु" सर्व वेदांमधला प्रणव म्हणजे ॐ कार मी (गीता ७.८) असें सांगून, " ॐ ह्या एकाक्ष ब्रह्माचा जप करीत व माझें स्मरण करीत जो मनुष्य देह सोडून जातो त्याला उत्तम गति मिळते" असा दिलासा गीतेंत दिला असल्याचें (गीता ८-१३) सर्वश्रुतच आहे.

"तस्य वाचकः प्रणवः।
तज्जपस्तदर्थभावनम् ॥"

-(पा. योगसूत्रे २७ व २८)

म्हणजे, " ॐ हाच परब्रह्मवाचक मंत्र आहे, त्याचा अर्थ ध्यानांत घेऊन त्याचा जप करा" असें योगसूत्रकार पतंजलीनीं मुमुक्षूला बजावून सांगितलें आहे. धर्मशास्त्रकारांनी सुद्धां ॐकाराला प्राधान्य दिलें आहे; एवढेंच नव्हे, तर "वेदाध्ययनाच्या प्रारंभी व शेवटी ॐ असा उच्चार करावा" असा मनुस्मृतीकारांचा देखक आहे (मनु. २-७४)

पुराणकारांनीही ॐ ची प्रशंसा जागोजागीं करून, त्याची महती सांगणाऱ्या अनेक कथा[४] दिल्या आहेत. त्या दृष्टीनें

४. उदाहरणार्थ, सद्धर्म, वर्ष २, अंक २, पृष्ठ १५ वरील ब्रह्मदेवाची गोष्ट पाहावी.

स्कंदपुराणांत दिलेल्या प्रणव ह्या शब्दाच्या व्युत्पत्ति[५] अत्यंत मनोवेधक आहेत. त्यावरून पुराणकार प्रणवाला किती शिरोधार्य मानीत होते तें सहज दिसून येतें.

प्राचीन वाङ्मयाप्रमाणें आधुनिक ग्रंथांतूनही प्रणवाची प्रशंसा अनेक ठिकाणीं आढळून येते. रघुवंशाची थोरवी गातांना 'आसीन्महीक्षितामाद्यः प्रणवश्छंदसामिव।' असें म्हणून कालीदासानें अखिल वेदांत प्रणव हाच सर्वश्रेष्ठ असल्याचें ध्वनित केलें आहे (रघु. १.११)

ज्ञानोबांनीं आपल्या ज्ञानेश्वरीची सुरवात ॐकाराच्या नमनानें केली असल्याचें आपल्या ध्यानांत असेलच. पुढे १७ व्या अध्यायांत ओंकाराची महती सांगून

"हेचि एकी हातवटी । घेऊनी हन किरटी। आले ब्रह्मस्विमेटी। ब्रह्माचिये॥"
(ज्ञा. १७-३५५)

असें त्यांनीं म्हटलें आहे.

एकनाथ महाराजांनीही "माझें वेदतत्व जे कां गुप्त। प्रणवरूपें हृदयाआंत। योगी सदा अनुभवित। त्याचें स्वरूप निश्चित अवधारीं॥", (ए. भा. २१ : ४०४) असें सांगून पुढें प्रणवाचें विवरण केलें आहे.

संत कबीर तर ॐ मंत्राला आपलें सर्वस्वच समजत होता. त्यानें गाइलेलें स्वानुभवाचें पद ह्या अंकाच्या सुरवातीस दिलें आहे.

अशा प्रकारें अगदीं प्राचीन अशा वेदकाळापासून तो आजतागायत भारतांत ॐ ह्या मंत्राला अग्रेसरत्व मिळालेलें आहे. मध्यंतरीच्या काळांत आपल्या देशांत अनेक मतें आणि पंथ अस्तित्वांत आले. पण विनाअपवाद त्या सर्वांनीं ॐ ला शिरोधार्य मानलें आहे. अद्वैतवादी, विशिष्टाद्वैती, द्वैती एवढेंच काय, पण निरीश्वरवाद्यांनीही ॐलाच प्राधान्य दिलें आहे. जैन आणि बौद्धही त्याला मानतात. मानससरोवराच्या आसमंतांतील तिबेटी मुलखांत गिरीकंदरांतूनही ठिकठिकाणीं ॐचा निनाद घुमत असतो, असें आधुनिक प्रवाशांच्या वर्णनांतून वाचावयास मिळतें.

अशा प्रकारें ॐ हा मंत्र सर्वमान्य होण्याचें कारण तो अनाहत ध्वनी असल्यानें त्याचा जप अखंडपणें करतां येतो व त्यांतून साहजिकरीत्या अप्रतिहत निर्माण होणाऱ्या ध्वनिलहरी नादब्रह्माचा[६] साक्षात्कार करून

---

५. उदाहरणार्थ, भक्तमुन्नयति इति ओम्, ही व्युत्पत्ति अर्थातच काल्पनिक आहे. अवति इति ओंकारः। जो रक्षण करतो तो ओंकार ही व्युत्पत्ति मात्र व्याकरण शुद्ध आहे. अव् (१ प.), रक्षण करणें ह्या धातूपासून अवतेष्टिलोपश्च (उ. १-१४२) ह्या सूत्रानें 'मन्' प्रत्यय, ज्वरत्वर (पाणिनी ६-४-२०) ह्या सूत्रानें, 'उ' प्रत्यय व संधि होऊन 'ॐ' रूप तयार होतें. अवति इति ॐ. नंतर ॐ शब्दाला 'कार' प्रत्यय जोडून ॐकार हा शब्द तयार झाला (अमरकोश, रामाश्रमी, १-६-४)

—स्कंदपुराण, काशीखंड, उत्तरार्ध

६. नादब्रह्म म्हणजे नादरूपानें अवतरलेलें ब्रह्म.—दाते शब्दकोश.

देतात हेंच होय. सुरवातीस म्हटल्याप्रमाणे तो ध्वनि आणि त्याचे ॐ हें चिन्ह हीं भारताचीं खास वैशिष्ट्यें आहेत. प्राचीनतम अशा आपल्या पूर्वजांकडून आपल्याला मिळालेला तो एक अद्भुत असा अमोल वारसा आहे. त्याला टिकविणें आपल्याच हातीं आहे.

तो अक्षय टिको हीच परमेश्वराचे चरणीं प्रार्थना आहे.

॥ ॐ ॥

पुढल्या वर्षी लवकर या

गत मासीं गणपती आले, आपण त्यांची पूजा केली आणि 'गणपतिबाप्पा मोरया पुढल्या वर्षी लवकर या', असं म्हणत त्यांना निरोप दिला.

पण पुढल्या वर्षी ते परत येईपर्यंत, त्यांच्या आगमनानें घरोघरी पसरलेलं मांगल्याचं वातावरण आणि त्यामुळें सर्वत्र झालेला आनंदीआनंद आपण विसरणार का!

त्याची थोडीशी का होईना पण आठवण होत राहावी म्हणून या अंकासोबत आम्ही एक छोटीशी भेट धाडत आहों. त्यांतील प्रार्थना म्हणायला एका मिनिटाहून अधिक वेळ लागणार नाही.

सकाळीं उठतांच देवाला नमस्कार करा, स्नान करतांना गंगामाई ध्यानीं आणा, दिवे लावणीला दीपज्योतीला वंदन करा आणि रात्रीं निजतांना आपल्याला निर्भय भविष्यासाठीं भगवंताची आण भाका. प्रार्थना मनांत म्हणा कीं मोठ्यानें म्हणा, पण किती समाधान लाभतें तें अनुभवानेंच पाहा. आम्ही तें कसें सांगणार?

आचार्यांना मंडन मिश्रांचे घरीं जायचें होतें. घराची खूण म्हणून कुणी सांगितलें कीं ज्या घराच्या दारांतील पोपट वेदघोष करीत असलेले ऐकूं येईल, तेंच मिश्रांचें घर समजा. आणि खूण अगदीं अचूक होती. कारण मंडनमिश्रांचें घरीं सदा वेदाची चर्चा चाले. यामुळें घरांतील माणसेंच काय पण दारचे पोपटही वेद म्हणत असत!

आपल्या तोंडी जर ही प्रार्थना बसतील तर आपल्या घरांतील माणसांच्याच काय पण छोट्या मोठ्या पोपट-मैनांच्याही तोंडी त्या होतील आणि मग आपल्या घरांत मांगल्याचें वातावरण पसरून दारावरून जाणाऱ्या येणाऱ्यांनाही त्याचा आस्वाद मिळेल. अनुभव घेऊन पाहा.

॥ ॐ तथास्तु ॥

सूचीकटाहन्याय

दैनंदिन व्यवहारांत उपयुक्त होतील असे कांही अनुभव संस्कृत भाषेंतं सूत्ररूपानें नमूद आहेत. त्यांना 'न्याय' असें म्हणतात. 'सूचीकटाह' हा अशा प्रकारचाच एक न्याय आहे. सूची म्हणजे बारीकशी सुई आणि कटाह म्हणजे भली थोरली कढई.

लोहार आपल्या दुकानांत गिऱ्हाइकाची मोठी थोरली एखादी कढई ठोकून दुरुस्त करीत असावा. इतक्यांत दुसरें एखादें गिऱ्हाईक हातांत एक बारीकशी सुई घेऊन यावें आणि त्यानें घाईघाईनें म्हणावें, "लोहारदादा, माझी एवढी ही सुई ठोकून सरळ करून देता का? माझं काम अडलें आहे."

घामाघुम झालेला बिचारा तो लोहार हातांतील हातोडा बाजूस ठेवतो व मुकाट्यानें वांकलेली ती सुई हातीं घेऊन पटकन नीट करून त्या सुईवाल्या गिऱ्हाइकाला वाटेला लावतो!

याला सूचीकटाह न्याय म्हणतात. बराच वेळ लागणारें एखादें काम चालू असतां, तें क्षणभर बाजूला सारून दुसरें एखादें बारकेसें काम मध्येंच करून देणें हा व्यवहार आहे. त्यांत मोठें काम अडणाराचें कांहीच नुकसान न होतां, लहान कामवाल्या माणसाची मात्र भली मोठी सोय होते.

हा सूचीकटाह न्याय ध्यानीं बाळगल्यास व्यवहारांतले किती तरी गैरसमजुतीचे व रागबारागवीचे प्रसंग सहजरीत्या टळतील.

उदाहरणार्थ नुकतीच घडलेली एक गोष्ट आहे. आमचे डॉक्टर आपल्या दवाखान्यांत एका जुन्या पेशंटशीं बोलत होते. एकीकडे त्याच्या प्रकृतीबद्दल त्याला प्रश्न विचारीत असतां हातांनी ते समोरच्या कागदांच्या पुडक्यांतून त्या पेशंटच्या केसचे कागद शोधीत होते. इतक्यांत रडणारें एक मूल हातांत घेऊन घाबरलेले एक गृहस्थ घाईघाईनें बाहेरून आंत डॉक्टरांपाशीं आले आणि त्यांना केविलवाणेपणानें म्हणाले, "डॉक्टरसाहेब, ह्या मुलाला काय झालें आहे, पाहातां का? रात्रभर रडतें आहे."

तेव्हां डॉक्टरांनी मुकाट्यानें हातांतील केसीचे कागद बाजूस ठेवले व त्या गृहस्थाला मुलासह आतल्या खोलींत नेऊन कांहीतरी तात्पुरता इलाज करून त्याचें रडें थांबविलें व ते लगेच बाहेर आले. येतायेतां, ते त्या गृहस्थाला म्हणाले, "हें पाहा, घाबरूं नका. पण तावडतोब मुलाला हॉस्पिटलमध्यें नेऊन त्याचा एक्सरे काढून आणा, मग काय तो इलाज करूं. असेच तिकडे जा."

त्याप्रमाणें तो गृहस्थ मुलाला घेऊन निघून जातांच, डॉक्टर पुन्हा आपल्या टेबलाशीं बसून त्या जुन्या पेशंटची केस पूर्ववत् शोधूं लागले.

पण इकडे आपला तो जुना पेशंट रागानें लाल झाला होता. संतापतच तो डॉक्टरना म्हणाला, "डॉक्टरसाहेब, मी जुना पेशंट इतका वेळ इथे बसलों असतांना, मला बाजूला सारून तुम्ही त्या नव्या पेशंटच्या मागें गेलांत, ह्याचा अर्थ काय? हा माझा अपमान नाहीं का?"

डॉक्टरांनी मुकाट्यानें उत्तर दिलें, "साहेब, हा सूचीकटाह न्याय आहे."

त्यांच्या त्या जुन्या पेशंटसाहेबांना तो सूचीकटाह न्याय ठाऊक असता तर वरील रागबारागवीचा प्रसंग अर्थातच टळला असता.

सेवेसीं श्रुत होय....

॥ श्री गणेशाय नमः ॥

गेल्या वर्षी 'सद्धर्म' पोरका झाला तेव्हांपासून "माझी मेटवा जननी" असा जनाबाईचे शब्दांत संतांचे चरणीं टाहो फोडीत असतां, एकनाथ षष्ठी आली. तेव्हां एकनाथी भागवताच्या पारायणामुळेंच तिला शांति लाभली होती ह्याची आठवण झाली आणि तिनें पारायणें केलेल्या ग्रंथाची त्या दिवशीं समारंभपूर्वक पूजा करण्याचें आम्ही ठरविलें. पूजा कशा प्रकारें करावयाची ह्याचा विचार चालू असतां स्वतः नाथांनींच आपल्या भागवतांत षोडशोपचार पूजाविधीची समग्र माहिती दिली असल्याचें ध्यानांत येऊन, त्या अनुरोधानेंच पूजा यथाविधी करण्याचें निश्चित झालें. व त्याप्रमाणें षष्ठीच्या दिवशीं आम्ही आमच्या स्नेह्यांसुहृदांसह त्या ग्रन्थाची सकाळीं समारंभपूर्वक पूजा व सायंकाळीं भजन वगैरे कार्यक्रम केला.

त्या दिवशीं निर्माण झालेल्या एकंदरींत मांगल्याच्या वातावरणामुळें आम्हांसच काय पण त्या वेळीं उपस्थित असलेल्या साऱ्या सज्जनानांच अत्यंत आनंद आणि समाधान झालें आणि 'सद्धर्मा'च्या सुहृद वाचकांसही ह्या आनंदांत कसे सहभागी करतां येईल ह्याचा आम्ही विचार करूं लागलों. तेव्हां एकनाथी भागवताच्या अनुरोधानें तयार केलेल्या षोडशोपचार पूजाविधीची पोथी मंत्र व तंत्रासह सुबाच्य व समग्रपणें छापवून ती त्यांचे हातीं दिल्यास हें कार्य अंशतः तरी सिद्धीस जाईल असें वाटलें. त्याप्रमाणें मग तशी पोथी लगेच तयार करवून ती 'सद्धर्माच्या' एप्रिल अंकासमवेत पुरवणी म्हणून वाचकांच्या हातीं देण्यांत आली.

वाचकांनीं त्या पोथीचें अपेक्षेबाहेर स्वागत आणि कौतुक केलें व 'लवकरच गणपति येत आहेत, त्या वेळीं श्रीगणेशाच्या पूजेसाठीं अशीच एखादी पोथी मिळाल्यास गणपतीची पूजा भटजीसाठीं खोळंबून न राहतां स्वतःच स्वस्थ व शांतपणें करून आम्हाला पूजेचा खराखुरा आनंद मिळवितां येईल. तेव्हां तशी एखादी पोथी छापल्यास बरें" असे संदेश आम्हाला आमच्या अनेक वाचकांकडून आले.

आपल्या सुहृदांना आनंद प्राप्त करून देण्याची ही नामी संधि 'सद्धर्म' कशी वायां जाऊ देईल! ती साधण्यासाठीं मुळींही विलंब न लावतां षोडशोपचार पूजाविधीच्या पोथीच्या धर्तीवरच लगेच श्रीगणेशाच्या पूजेची समग्र पोथी तयार करून ती 'सद्धर्माच्या' जुलैच्या अंकासमवेत गणेशचतुर्थीच्या जवळ जवळ महिनाभर आधीं वाचकांच्या हातीं पुरवणी म्हणून देण्यांत आली.

तिचें स्वागत आणि कौतुक तर वाचकांनीं पूर्वीच्या म्हणजे षोडशोपचार पूजाविधीच्या पोथीपेक्षांही कितीतरी पटीनें अधिक केलें! पहिल्या पोथीच्या वेळीं आमच्या वर्गणीदारांची संख्या सुमारें ३२०० होती; ती ही दुसरी पोथी बाहेर पडतांच एका महिन्यांत अंदाजें ४७०० पर्यंत गेली! म्हणजे संख्या जवळ जवळ १५०० नें वाढली!! त्यासाठीं आम्ही कुठल्याही प्रकारें जाहिरात केली नव्हती कीं अन्य कुणाचें साहाय्य

आम्हास लाभले नव्हतें. तुम्या वर्गणीदारांनीं आपल्या आप्तेष्टांत व स्नेह्यासोबत्यांत स्वयंस्फूर्तीनें तोंडोतोंडी केलेल्या प्रचाराचेंच हें फळ आहे. पण त्यावरून अशा प्रकारच्या पोथीची समाजाला किती आवश्यकता भासत आहे, हें निश्चित दिसून येतें. असो.

श्रीगणेशपूजेच्या पोथीला अशा प्रकारें ही अकल्पित मागणी आली, एवढेंच नव्हे तर, "यंदा चतुर्थीच्या दिवशी आम्ही भटजींची वाट न पाहातां ह्या पोथीवरूनच गणरायाची स्वतः पूजा केली व त्यामुळें आम्हास अतिशय आनंद होऊन समाधान लाभलें, त्यासाठी धन्यवाद" अशा अर्थाचे अनेक संदेश आम्हांकडे अनेक सज्जनांकडून आले व अजूनही येत आहेत.

श्री गणेशाच्या पूजेचा आनंद लाभून अशा प्रकारें घरोघरी ही मागल्याचा प्रसार झाला, त्याचें सारें श्रेय एकनाथषष्ठीच्या दिवशी झालेल्या भागवताच्या पूजेलाच आहे.

सद्गुरु श्री नाथांनींच पहिली षोडशोपचार पूजाविधीची पोथी तयार करण्याची प्रेरणा दिली होती व त्या त्यांच्या प्रेरणेतूनच श्री गणेशाच्या ह्या पोथीची प्रेरणा निर्माण झाली. नाथांचीच ही सारी कृपा आहे. त्यामागें अर्थातच 'सद्धर्म' जननीची थोर पुण्याई आहे. त्या पुण्याईमुळेंच नाथांच्या कृपेनें वाचकांच्या हातीं ही पोथी देऊन घरोघरी मांगल्याचा प्रसार करण्याची संधी सद्धर्माला लाभली. "तुका म्हणे थोरा पुण्यें। ओस आला पंथे येणें॥" त्या पुण्याईचेंच हें फळ आहे.

पुढेंही ती आम्हास अशीच लाभो, अशी श्री नाथांच्या चरणीं प्रार्थना असो.

— तत्सत्

धर्म गतिमान आहे*

ह्या संदर्भात पुढील माहिती उद्बोधक होईल :

"काळाच्या ओघावरोबर स्मृति बदलल्या पाहिजेत"—स्वामीविवेकानंद, खंड १७, पृ. १८१.

"मला वेळ मिळाल्यास मी एखादी स्मृति लिहीन" असें लो. टिळक म्हणत असत, असें त्यांच्या निकटचे कांही लोक सांगतात.

"Smritis produced in the future, so long as they are based on fundamental truths of spirit set forth in the Vedas, will be quite authoritative."—Dr. Radhakrishnan, I.c. p. 117.

* सद्धर्म, १९७१, एप्रिल अंक, पृ. १९ पहा.

मुद्रक व प्रकाशक : भालचंद्र उपासनी. सद्धर्म प्रकाशन, ९ ओबेनडन रोड, मुंबई ७
मुद्रणस्थळ : मीज प्रिंटिंग ब्यूरो, गिरगांव, मुंबई ४